
ससेच ससे!

लेखिका: पेगी पॅरिश

चित्रे व सजावट: लिओनार्ड केस्लर

अनुवाद: सुजाता गोडबोले








ससेच ससे!

लेखिका: पेगी पॅरिश

चित्रे व सजावट: लिओनार्ड केस्लर

अनुवाद: सुजाता गोडबोले





ठक ! ठक ! ठक !

“हा कसला आवाज आहे बरं?”

मॉली म्हणाली.

ठक ! ठक ! ठक !

“परत तोच आवाज!”

मॉली म्हणाली.

“काय चाललं आहे ते बघायलाच हवं.”

मॉली आपल्या दाराजवळ गेली.

तिने दार उघडले.

तिथे एक ससा बसला होता.

“अरे बापरे!” मॉली म्हणाली.

“तू कुठून आलास?” मॉलीने विचारले.

ससा आता मॉलीकडेच पाहत होता.

मग तिने उघड्या दाराकडे बघितले.

“असं होय!” मॉली म्हणाली.

“तुला यायचं असलं तर आत ये.”





पण ससा अगोदरच आत आला होता.

“ये, मी तुला खाऊ देते,” मॉली म्हणाली.

“मग मात्र तू घरी जा.”

असं म्हणून मॉलीने सशाला खायला दिले.

“आता झालं हं! आता जा,” ती म्हणाली.

आणि तिने दार उघडले.

पण ससा बाहेर जाण्याऐवजी घरातच आला.







“म्हणजे तू इथे राहायलाच आला आहेस तर!”
मॉली म्हणाली.

“बरं! आजच्या दिवस राहा.

पण उद्या मात्र तुला जावं लागेल.


तुला मी एक पुठ्ठ्याचा डबा देते.”

आणि तिने सशाला झोपायला
एक पुठ्ठ्याचा डबा दिला.

सशाने आनंदाने डब्यात उडी मारली.

आणि मॉली पण झोपायला गेली.

लवकरच तिला झोप लागली.



दुसऱ्या दिवशी सकाळी मॉली उठली.

ती स्वयंपाक घरात गेली.

ससा अजून आपल्या डब्यात बसला होता.

“छान झोप झाली का?”

मॉलीने विचारले.

ससा काहीच बोलला नाही.

“हा घे तुझा नाश्ता,”

मॉली म्हणाली.

पण ससा जागेवरून हलला देखील नाही.

“तू फारच आळशी दिसतोस,” मॉली म्हणाली

आणि सशाच्या डब्याजवळ गेली.

तिथे तर तिला आश्चर्याचा धक्काच बसला.

डब्यात काही एकच ससा नव्हता.

तो पुठ्ठ्याचा डबा सशांनी भरून गेला होता.

“अरे बापरे!” मॉली म्हणाली.

“सशाची पिले! कितीतरी पिले!

“म्हणूनच तुला राहायचं होतं तर!”

मॉलीने मान हलवली.

“लहान पिलांची तर खूपच काळजी घ्यावी लागते.

ती पिले जरी सशांची असली तरीही.

आता तर मला त्यांना इथे राहू द्यावंच लागेल,”

ती म्हणाली.

मग सगळे ससे तिथेच राहिले.



सुरुवातीला त्यांचा काही फारसा त्रास नव्हता.

बाळांना फक्त दूध मिळाले की झाले!

त्यांच्या आईकडे भरपूर दूध होते.

सशांची वाढ खूप लवकर होते.

लवकरच त्यांना खरे अन्न हवे होते.





मॉलीला ते बाजारातून आणावे लागले.

गाजरे, हिरवी पाने आणि मक्याचे दाणे.

कोबी, सफरचंदे आणि नवलकोल.



"अरे बापरे!" मॉली म्हणाली.

या सशांना तर माझ्याहून अधिक जेवण लागते.

आता काही तरी करायला हवे.

यातल्या काही सशांना बाहेर सोडून द्यावे लागेल."

मग तिने त्यांच्याकडे पहिले.

"पण हे तर किती गोड दिसतात," ती म्हणाली.

"शिवाय ते अजून लहान आहेत."

मग तिने सर्वच सशांना घरात ठेऊन घेतले.



ससे काही फार दिवस लहान राहिले नाहीत.

लवकरच ते सगळीकडे फिरू लागले.

ते खुर्चीवर होते

आणि खुर्चीखाली पण होते.

ते पलंगावर होते

तसे पलंगाखाली पण होते.

आंघोळीच्या टबमध्ये देखील होते.

“अरे बापरे!” मॉली म्हणाली.





“आता माझ्याकडे फारच ससे झाले आहेत.

ते सगळे मोठेही झाले आहेत.

आता मात्र त्यांना घालवून द्यायला हवे.”

मग ती विचार करू लागली.

तिने मान हलवली.

“नाही,” ती म्हणाली. “असं कसं करणार?

मला माझे ससे आवडतात.”

मग तिने सगळे ससे ठेऊन घेतले.

मग एक दिवशी सकाळी

मॉलीला आश्चर्याचा एक मोठाच धक्का बसला.

“अरे बापरे! हे काय!” ती म्हणाली.

“सशांची आणखी पिले!

आता मी करू तरी काय?”

मॉली विचारात पडली. तिला काहीच सुचेना.

म्हणून तिने काहीच केले नाही.

ही नवी पिले पण मोठी झाली.

आता सगळीकडे ससेच ससे होते.

ते खुर्चीवर होते

खुर्चीखाली होते.


ते पलंगावर होते


तसे पलंगाखाली पण होते.

अंघोळीच्या टबमध्ये होते

आणि कपड्यांच्या टोपलीत पण होते.







मॉलीला घरात चालायलाही जागा उरली नव्हती.

एक दिवस तिने पावाचा डबा उघडला.

त्यातून एका सशाने टुणकन उडी मारली.

"आता मात्र हे फार झालं!" ती म्हणाली.

या सशांना आता घालवायलाच हवं."







मॉलीने खिडकीबाहेर पाहिले.

तिला एक मुलगा दिसला.

“टॉमी!” तिने हाक मारली.

“तुला ससे आवडतात का?”

“हो तर!” टॉमी म्हणाला.



“तुझ्या मित्रांना पण ससे आवडतात का रे?”

मॉलीने विचारले.

“हो, आवडतात की,” टॉमी म्हणाला.

“ससे तर सगळ्यांनाच आवडतात.”

“छान!” मॉली म्हणाली.

“जा, तुझ्या मित्रांना पण घेऊन ये.

मी तुम्हाला सगळ्यांना ससे देणार आहे.”

“हुर्रे! टॉमी म्हणाला.





आणि आपल्या मित्रांना बोलवायला पळाला.

“ही एक चांगली कल्पना आहे,”

मॉली म्हणाली.

“मुलांना प्राणी पाळायला आवडतात.

ते माझ्या सशांची छान काळजी घेतील.”

आणि मॉली वाट पहात बसली.

थोड्या वेळाने तिच्या दारावरची घंटी वाजली.

तिने दार उघडले.



मुलांचा मोठा घोळका तिच्या दाराशी जमला होता.

“या, आत या,” मॉली म्हणाली.

“तुम्हाला हवे ते ससे निवडून घ्या.”

काही मुलांनी एकच ससा घेतला.

काहींनी दोन निवडले.

काहींनी तर तीन घेतले.

मुलांनी सगळे ससे घेतले.

आणि सगळी मुले निघून गेली.



तेवढ्यात दारावरची घंटी वाजली.

मॉलीने दार उघडले.

दाराबाहेर मुलांचा घोळका उभा होता.

आणि त्याहूनही मोठा सशांचा घोळका!

प्रत्येक मुलाचे सांगणे होते,

"माझी आई म्हणाली, "नाही."

आता घरभर सगळीकडे ससेच ससे भरले होते.

"अरे बापरे!" मॉली म्हणाली.

"आता मी करू तरी काय?"

मॉली लगबगीने घरात आली.

तिने सर्व घराची साफसफाई केली.

तिचे घर परत चमकू लागले.

मग तिने स्वतःसाठी छान चहा केला.

"आता घरात एकटीला किती बरे वाटते!" ती म्हणाली.





मॉली परत विचारात पडली.

मग काहीतरी सुचल्यावर तिने मान डोलावली.

“प्राणिसंग्रहालय!” ती म्हणाली.

“तिथे खूप प्राणी असतात.


माझे ससे मी त्यांना देईन.”

मग मॉलीने प्राणिसंग्रहालयात फोन लावला.

पण प्राणिसंग्रहालय म्हणाले, “नको.”

त्यांना ससे नको होते.





मॉली घरात जिथे कुठे पाऊल ठेवेल

तिथे एक ससा होताच.

आता काहीतरी करायलाच हवे होते.

रात्री झोप लागेपर्यंत

मॉली विचार करत होती.

सकाळी उठल्यावर तिला एक कल्पना सुचली.



“मी वर्तमानपत्रात एक जाहिरात देते.”

ती म्हणाली.

आणि तिने एक जाहिरात दिली.

त्यात म्हटले होते: “ससे फुकट मिळतील.”

आणि मॉली वाट पाहू लागली.

अखेर एकदा दारावरची घंटी वाजली.

एका खाटीक आला होता.

“मी तुमचे ससे घेऊन जाईन,” तो म्हणाला.

“सगळेच्या सगळे?” मॉलीने विचारले.

“हो,” खाटिकाने उत्तर दिले.


“खूप लोकांना सशाचे मांस आवडते.”


“नाही! नाही!” मॉली म्हणाली.

“हे मी पाळलेले ससे आहेत.

ते मारून खाण्यासाठी नाहीत.”

आणि तिने धाडकन दार बंद केले.





"मी तुमचे ससे घ्यायला आलो आहे."
तो माणूस म्हणाला.

"तुम्हाला ते खाण्यासाठी हवे आहेत का?"

"नाही! मुळीच नाही!"

"मग तुम्ही त्यांचे काय करणार आहात?"
मॉलीने विचारले.

दुसऱ्या दिवशी दारावरची घंटी परत एकदा वाजली.

मॉलीने दार उघडले.

दारात एक माणूस उभा होता.

बाहेर एक मोठा ट्रक उभा होता.



“माझं एक बेट आहे,” तो माणूस म्हणाला.

“तिथे खूप गवत आणि झाडं आहेत.

तिथे एक झरा देखील आहे.

पण तिथे ससे नाहीत.

मला ससे फार आवडतात.”

“झाडं, गवत, झरा,”

मॉली म्हणाली.


“माझ्या सशांना ते सगळं आवडेल.”

मग तिने मान डोलावली.

“मी तुम्हाला माझे सगळे ससे देते.” ती म्हणाली.

मग त्यांनी दोघांनी सगळे ससे ट्रकमध्ये चढवले.

मॉलीने त्यांचा निरोप घेतला.







मॉलीच्या पायाजवळ काहीतरी मऊ मऊ लागले.

मॉलीने खाली पहिले.

राखी रंगाचे एक मोठे मांजर तिला दिसले.

“खरं तर मला एक मांजर हवंच होतं!”

मॉली म्हणाली.


“तू ये आत.

मांजराचा काहीच त्रास नसतो.”

मॉली रात्री आनंदाने झोपली.

तिच्या सशांना चांगले घर मिळाले होते.

आणि तिला एक छान मांजर.



दुसऱ्या दिवशी सकाळी मॉली उठली.

ती स्वयंपाकघरात गेली.

मांजर अजून आपल्या डब्यातच होते.

“रात्री चांगली झोप आली का?”

मॉलीने विचारले.

मांजराने काहीच उत्तर दिले नाही.

“हा घे तुझा नाश्ता.”

मॉली म्हणाली.

पण मांजर जागचे हलले देखील नाही.

“तू फारच आळशी आहेस!” मॉली म्हणाली.

मग ती मांजराच्या डब्याजवळ गेली.

मॉलीने आश्चर्याने आपले हात हवेत उडवले.

“अरे बापरे!” ती म्हणाली.

डबा तर मांजराच्या पिलांनी भरून गेला होता!

“हे आणखी काय नवीनच,” मॉली म्हणाली.



“त्या बेटावर राहणाऱ्या माणसाला

मांजरे आवडत असतील का?”



मग मॉलीने परत एकदा आपली मान हलवली.

“पण त्याआधी या पिलांना मोठं करावं लागेल.

लहान बाळांची खूप काळजी घ्यावी लागते.

आणि ही तर किती गोड दिसताहेत.”

मॉली मग स्वतःशीच हसली.

आणि पिलांच्या आईसाठी दूध गरम करायला

स्वयंपाक घराकडे वळली.

समाप्त